TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : २६ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : २४ ते ३० जुन २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

## येत्या दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेविरहीत होणार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

**मुंबई** : संपूर्ण मुंबईतील रस्त्यांचे सिमेट काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. येत्या दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेविरहित होतील. वाहतूक कोंडीमुक्त मुंबईसाठी महाराष्ट्र शासन, मुंबई पोलीस यांच्यासमवेत मिळून बृहन्मुंबई महानगरपालिका एकत्रितपणे काम करीत आहे. मुंबईतील चौपाट्यांवरही स्वच्छता मोहीम राबविली जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुंबईचे माजी नगरपाल (शेरीफ) पद्मश्री नाना चुडासामा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मरिन ड्राईव्ह परिसरात शामलदास गांधी मार्गावरील प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुलाखाली साकारण्यात आलेल्या शिल्पाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. मुंबई अधिक स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासन, महानगरपालिका अथक परिश्रम घेत आहे. मात्र, यासोबतच विविध संस्था, संघटना आणि सर्वसामान्य मुंबईकरांनीही या मोहिमेत सहभागी व्हायला हवे. त्यासाठी सखोल स्वच्छता मोहीम सुरू आहे. ही मोहीम सुरू झाल्यापासून मुंबईतील



प्रदूषण कमी झाले आहे, असा दावा शिंदे यांनी केला. मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचा काही भाग वाहतुकीसाठी खुला केल्यापासून दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी झाली आहे. मुंबईकरांचा वेळ, पैसा आणि इंधनाची बचत होत आहे. मुंबई आपली आहे, तिच्यासाठी काही तरी करायला हवे, या भावनेने आय लव्ह मुंबई आणि जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनसारख्या आणखी काही संघटना एकत्र येतील, तेव्हा मुंबईच्या विकासाचा वेग नक्कीच वाढेल, असा विश्वासही शिंदे यांनी व्यक्त केला. नागरिकांमध्ये योगबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आय लव्ह मुंबई आणि जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनच्या शायना एन. सी. यांच्या नेतृत्वाखाली शामलदास गांधी मार्गावरील उड्डाणपुलाखाली विविध योगमुद्रा कलाकृती साकारण्यात आल्या आहेत. बाया डिझाईनच्या शिबानी दास गुप्ता यांनी ही शिल्पे साकारली आहेत. मरिन ड्राईव्ह येथे किलाचंद चौकात जागतिक योग दिनानिमित्त आयोजित योग शिबिरात महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, उप आयुक्त संगीता हसनाळे, सहायक आयुक्त पृथ्वीराज चौहाण, सहायक आयुक्त जयदीप मोरे, आय लव्ह मुंबई आणि जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनच्या शायना एन. सी., ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ आदी उपस्थित होते.

## महसूल प्रशासन, पोलीस अधिकारी यांच्या कृपेने घनसावंगी विधानसभा मतदारसंघात रात्रंदिवस सर्रास वाळूची चोरी

### वाळू चोरी थांबविण्याकरता घनसावंगी तालुक्यातील शिष्ठमंडळाचे आमदार लोणीकर यांना निवेदन

### गोदापात्रातून होत असलेली अवैध वाळू चोरी थांबविण्याची घनसावंगी तालुक्यातील शिष्टमंडळाची मागणी

### जालना जिल्ह्यात होत असलेल्या वाळू चोरीच्या प्रश्नाकडे लक्षवेधी द्वारे सरकारचे लक्ष वेधणार

### आमदार बबनराव लोणीकर यांचे घनसावंगी तालुक्यातील शिष्टमंडळास आश्वासन

जालना (प्रतिनिधी) घनसावंगी विधानसभा मतदारसंघात मोदी आवास योजना, रमाई आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजना चे जवळपास दहा हजार घरकुल मंजूर झाले असून घरकुलांचे बांधकामांसह विकास कामांना वाळू मिळत नसून घनसावंगी तालुक्यातील रामसगाव जोगलादेवी शेवता सौंदलगाव बानेगाव भोगाव मुद्रगाव मंगरूळ या गावातील गोदापात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा गेल्या अनेक दिवसापासून बिनधास्तपणे सुरू असल्याने येथील वाळू माफिया चा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याचे दिसते या वाळूने भरलेल्या हायवा तीर्थपुरी घनसावंगी कुंभार पिंपळगाव शहागड आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाळूची दिवसा ढवळ्या व भरधाव वेगाने केली जाते मात्र येथील महसूल तसेच तीर्थपुरी तसेच गोंदी पोलीस स्टेशनच्या नाकावर टिचून या हायवा भरधाव वेगाने सुरू असतात. तहसीलदार घनसावंगी तहसीलदार अंबड पोलीस ठाणे तीर्थपुरी व गोंदी हे सर्रास हप्ते घेऊन वाळू चोरांना संरक्षण देत असल्या बाबत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सदस्य अंकुशराव बोबडे यांच्या नेतृत्वात आज घनसावंगी येथील शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर



यांच्याकडे निवेदनाद्वारे जिल्हा भरातील वाळू चोरी बंद करण्याबाबत विनंती करणारे निवेदन दिले असून गोदा पात्रातील वाळू चोरांनी केलेल्या खड्ड्याची मोजणी करून तहसीलदार घनसावंगी तहसीलदार अंबड पोलीस निरीक्षक तीर्थपुरी आणि गोंदी यांच्याविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्याकरिता विनंती करण्यात आली आहे. येत्या मुंबई येथील पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी द्वारे सरकारचे लक्ष वेधाव अशी विनंती देखील या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी देखील येत्या मुंबई येथील पावसाळी अधिवेशनात जिल्हा भरातील वाळू चोरीच्या संदर्भात लक्षवेधी द्वारे सरकारचे लक्ष वेधणार असल्याचं आश्वासन दिलं आहे.

# ओबीसी फाउंडेशन इंडिया जाहीर पाठिंबा




वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण संदर्भात सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा आज नऊवा दिवस सुरू आहे. उपोषणस्थळी जाऊन प्रा.लक्ष्मण हाके सर व नवनाथ वाघमारे यांची भेट घेतली. राज्यभरातील ओबीसी भटक्या विमुक्त बांधवांचे लक्ष लागलेल्या या आंदोलनाला संपूर्ण राज्यातून पाठिंबा मिळत आहे. व ओबीसी फाउंडेशन इंडिया वतीने ओबीसींच्या नेतृत्वाचा वनवास संपवणारा लक्ष्मण या चळवळीला भेट देऊन आहे. जाहीर पाठिंबा चे पत्र देताना लक्ष्मण लटपटे प्रदेशाध्यक्ष ओबीसी फाउंडेशन महाराष्ट्र इंडिया, श्री मारोतराव राठोड सामाजिक कार्यकर्ते ओबीसी बंजारा समाज परभणी, बळीराम मुंडे सामाजिक कार्यकर्ते ओबीसी नेते युवा ओबीसी फाउंडेशन चे हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये मा.प्र लक्ष्मण हाके नवनाथ वाघमारे सर यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला . वडीगोद्री तालुका अंबड जिल्हा जालना येथे एकच–पर्व ओबीसी सर्व.

# कारेगाव येथे कृषी संजीवनी पंधरवाडा मोहिमेतून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**कारेगाव** :लोणार तालुक्यातील कारेगांव येथे दिनांक १९/०६/२०२४ रोजी कृषी संजीवनी पंधरवाडा मोहिमेतून शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. मा.मंडळ कृषी अधिकारी बीबी श्री विलास जाधव यांनी जमीन आरोग्य पत्रिका,मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड,भाऊसाहेब पुंडकर फळबाग लागवड,शेततळे, कृषी यांत्रिकीकरण, मग्रारोहयो बांबू लागवड ई. योजनेची माहिती दिली. यावेळी उपस्थित कारेगाव येथील मा.सरपंच विठोबा गुंगे, विश्वासराव केंधळे विनायक चव्हाण, गणेश चव्हाण,मदन चव्हाण, संतोष गुंगे , समाधान चव्हाण गणेश केंधळे,शुभम चव्हाण, पत्रकार भागवत चव्हाण कृषि पर्यवेक्षक श्री. सचिन देशमुख,कृषि सहा-यक श्री. सुनिल कुरंगळ व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई महानगरपालिकेने अर्थसहाय्य केलेल्या बचत गटांच्या उत्पादनांची ऑनलाईन विक्री

**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य घेणाऱ्या महिला बचत गटांच्या वस्तू आता ऑनलाईन पद्धतीनेही विकत घेता येणार आहेत. महिला बचत गटांनी तयार केलेली उत्पादने आता संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. नवनवीन उत्पादनांची यात भर पडत आहे. यातून अधिकाधिक महिलांना रोजगार मिळत आहे. मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरांतील तब्बल आठ हजारांहून अधिक बचत गटांना अर्थसहा-य केले आहे. प्रत्येक बचत गटात दहा महिला सदस्य आहेत. या सर्व महिलांना त्यांचे घरकाम सांभाळून कुटुंबासाठी हातभार लावता यावा यासाठी महानगरपालिकेने विविध वस्तू, उत्पादने तयार करण्याचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच त्यांना अर्थसहा-यही दिले आहे. मुंबई महानगरातील आर्थिकदृष्ट्या गरजू महिलांना रोजगार मिळावा, महिला बचत गटांच्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यातून महिला आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी नियोजन विभागाकडून मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांत महिला बचत गटांतील सदस्य महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना विविध प्रदर्शने, व्यापारी संकुल, यात्रा, उत्सवांमध्ये विक्री करण्याची संधी मिळवून दिली आहे. विविध दुकानांच्या माध्यमातूनही या महिलांची उत्पादने ग्राहकांना उपलब्ध करण्यात येत आहेत. होतकरू मराठी मुलांनी नव उद्योगाच्या (स्टार्ट अप) माध्यमातून संकेतस्थळ सुरू केले आहे. या संकेतस्थळावर विविध ग्राहकोपयोगी वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मुंबई महानगरपालिकेने अर्थसहा-य केलेल्या बचत गटांतील महिलांना याच मुलांच्या माध्यमातून ऑनलाईन ऑर्डर कशी स्वीकारावी, त्यानंतर ग्राहकांना वस्तू कशी विकावी, ऑननाईन व्यवहार कसा करावा, याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑनलाईन व्यवसायासाठी महानगर पालिकेच्या नियोजन विभागाने बचत गटांची वर्गवारी केली आहे. त्यानुसार ज्या बचत गटांची उत्पादने (खाद्यपदार्थ वगळून) टिकावू असतील, अशा बचत गटांना ऑनलाईन विक्रीसाठी पुढे केले आहे. पुढील टप्प्यांत साधारण महिनाभर टिकू शकतील, असे खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या बचत गटांनाही ऑनलाईन विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती संचालक (नियोजन) डॉ. प्राची जांभेकर यांनी दिली. ही उत्पादने मिळताहेत ऑनलाईन बचत गटांनी तयार केलेले उटणे, अगरबत्ती, जुट बॅग्ज, इमिटेशन ज्वेलरी, मोत्याचे दागिने, साड्या, रांगोळी, परफ्यूम, ड्रेस, लेडीज कुर्तीज, फॅन्सी कँडल्स, विविध प्रकारची आकर्षक तोरण, दिवाळीसाठी कंदील, आकर्षक पणत्या, बांबूच्या आकर्षक वस्तू, तसेच सजावटीचे आकर्षक साहित्य आदी सध्या ऑनलाईन उपलब्ध आहे.

# महिला अत्याचार विरोधात तपास करणाऱ्या सीएडब्ल्यू शाखेत ६२ टक्के पदे रिक्त

**मुंबई :** महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या तपास करणाऱ्या महिला अत्याचार विरोधी शाखा (सीएडब्ल्यू) विभागात ६२ टक्के पदे रिक्त आहेत. गंभीर बाब म्हणजे येथील मंजूर उपायुक्त, सहा-यक पोलीस आयुक्त दोन्ही पदे रिक्त आहेत. याशिवाय पोलीस निरीक्षकाच्या दोन मंजूर पदांपैकी एक पद रिक्त आहे. तसेच सहा-यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्ष



पदाच्या १२ मंजूर जागांपैकी ८ पदे रिक्त आहेत. तर कनिष्ठ कर्मचाऱ्यांपैकी पोलीस हवालदार, पोलीस शिपाई यांच्या ६१ मंजूर पदापैकी ३७ पदे रिक्त आहेत. यंग व्हिसलब्लोअर फाउंडेशनचे जितेंद्र घाडगे यांना माहिती अधिकाराअंतर्गत ही माहिती प्राप्त झाली आहे. महिलांविरोधातील अत्याचाराबाबतच्या गंभीर घटनांचा लवकर तपास व्हावा यासाठी विशेष कक्ष असावा या उद्देशाने सीएडब्ल्यूची स्थापना करण्यात आली होती. पण आता या विभागात गुन्ह्यांचा तपास होत नाही. टपाल विभागाप्रमाणे त्यांना प्राप्त तक्रारी विविध पोलीस ठाण्याकडे चौकशीसाठी पाठवल्या जातात. जानेवारी २०२० ते एप्रिल २०२४ या कालावधीत सीएडब्ल्यूच्या कक्ष १ ला बलात्कार, अपहरण व विनयभंग अशा गंभीर गुन्ह्यांच्या २३० तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यातील ५० प्रकरणाची चौकशी बंद करण्यात आली आहे. उर्वरित १४४ तक्रारी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आल्या आहेत, तर ४ चौकश्या प्रलंबित आहेत. कौटुंबिक हिंसाचार, हुंडा बळी, खून, आत्महत्या व इतर तक्रारींचा तपास सुरू आहे. याशिवाय कक्ष- २ ला जानेवारी २०२० ते एप्रिल २०२४ या कालवधीत १६८८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी २७३ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. त्यातील ३०७ प्रकरणांचा तपास बंद करण्यात आला आहे. तर १०७७ प्रकरणे पुढील चौकशीसाठी स्थानिक पोलीस ठाण्यांकडे वर्ग करण्यात आली आहेत. तर ३१ प्रकरणे प्रलंबीत आहेत. मुंबईत यावर्षी महिलांविरोधात २५८४ गुन्हे घडले आहेत. त्यात बलात्कार, विनयभंग, छेडछाड यांसारख्या गुन्ह्यांचा सहभाग आहे. त्यांची नोंद विविध पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गेल्यावर्षी या काळात अडीच हजार गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती.

# लग्न जुळत नसल्याने तरूणीची आत्महत्या

**वसई :** लग्न जुळत नसल्याने एका तरुणीने नैराश्यापोटी आत्महत्या केली आहे. तिला बोलण्यात अडचण येत असल्याने तिचे लग्न जुळत नव्हते. श्वेनी धंधुकिया (३०) ही तरुणी आपल्या पालकांसह मिरा रोड येथील प्लेझंट पार्क येथे रहात होती. जन्मत: तिला बोलण्यात अडचण होती. त्यामुळे तिचे लग्न जुळत नव्हते. तिला लग्नासाठी बघण्यासाठी येणारी मुले तिच्या बोलण्यातील दोषामुळे तिला नकार देत होते. यामुळे श्वेनी



वैफल्यग्रस्त झाली होती. यामुळे आपल्या राहत्या घरात तिने स्वयंपाकघरातील पंख्याला ओढणीच्या सहा-याने गळफास घेऊन आत्महत्या केली. श्वेनीच्या वडिलांचा व्यवसाय आहे. ते आपल्या मुलीचे लग्न जुळविण्यासाठी प्रयत्न करत होते. येत्या नवरात्रीत दोन्ही मुलांचे लग्न करायचे होते. परंतु त्या आधीच आमच्यावर हे संकट कोसळलं असे तिच्या वडिलांनी सांगितले. श्वेनी दिसायला सुंदर होती. परंतु या दोषामुळे पुढील शिक्षण देखील करता आले नाही, असे तिच्या वडिलांनी सांगितलं. आम्ही या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे असे या प्रकरणाचा तपास करणारे काशिमिरा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तागडे यांनी सांगितले.

# रस्त्याला नाला नसल्यामुळे जिल्हा परिषद शाळेमध्ये शिरले पाणी



**कारेगांव :** कारेगाव येथे जिल्हा परिषद शाळा ही मुख्य रस्त्यावरती असून शाळेमध्ये येणाऱ्या मुख्य रस्त्याचे पाणी शिरत आहे आणि तसेच जिल्हा परिषद शाळेमध्येच गावाचे मुख्यालय म्हणजे ग्रामपंचायत आहे त्यामध्ये सुद्धा पाणी साचलेले होते. या दोन्ही ठिकाणी पाणी जाण्याचे कारण म्हणजे गावातील मुख्य रस्त्याला नाली नसल्यामुळे. गावातून जो मुख्य रस्ता लोणारला जातो त्या रस्त्याला नाली ही राहिलीच नसल्यामुळे जे रस्त्यावरील पाणी हे रस्त्या शेजारील लोकांच्या घरामध्ये व शाळेमध्ये आणि ग्रामपंचायत मध्ये शिरत आहे . ठेकेदाराने मुख्य रस्ता केला पण त्याला नाल्याच केल्या नाही त्यामुळे हा प्रकार घडत आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराला गावातील नागरिक हे त्रस्त झालेले आहे. त्या मुख्य रस्त्याचे काम दोन ते तीन वर्षापासून सुरू असून ते काम आजपर्यंत पूर्ण झालेले नाही जर शाळेमध्ये व ग्रामपंचायत मध्ये असे सतत पाणी शिरत राहिले तर शाळेचे आणि ग्रामपंचायत मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या नुसकानींची जिम्मेदारी कोण घेणार ठेकेदार की बांधकाम विभाग का संबंधित अधिकारी जर ठेकेदारांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाली ही नाही घेतली तर गावातील नागरिक आणि ग्रामपंचायत मिळून यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडणार आहे .गावामधील काही नागरिकांनी ठेकेदारास नाल्याविषयी विचारणा केली असता ठेकेदार हा फक्त उडावा–उडवीचे उत्तरे देऊन नागरिकांना शांत करत असल्याचे बोलल्या जात आहे. तसेच या मुख्य रस्त्याला समोर एक ओढा लागत आहेत त्या ओढ्यामध्ये सुद्धा ठेकेदाराने नुसते पोंगे गाडून त्याला कडा सुद्धा केलेल्या नाही. आता पाऊसाला सुरुवात होत आहे. जर कधाचीत जास्त पाऊस पाडला आणि त्या पोंग्याशेजारील मुरूम हा पाण्यासोबत वाहत गेला आणि पोंगे उघडे पडले तर त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या बाबीकडे बांधकाम विभागणे विशेष लक्ष देण्यात यावे आशी मागणी करेगांव येथील नागरिकांनी केलेली आहे.नाथा भाऊ दराडे (शासकीय ठेकेदार) यांना नाल्या विषयी विचारले आसता त्यांचे उत्तर आमच्या हादीत तो रस्ता येत नाही.

## घरे देण्याचे आमिष दाखवून ६० महिलांची फसवणूक; सुमारे अडीच कोटींच्या फसवणुकीप्रकरणी दोन भावांविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई :** मालाड येथील मढ परिसरात घरे देण्याचे आमिष दाखवून महिला मंडळातील सुमारे ६० महिलांकडून प्रत्येकी चार लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी मालवणी पोलिसांनी दोन भावांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एकूण दोन कोटी ४० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारी करण्यात आला असून याप्रकरणी मालवणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. मढ येथील शिवाजी नगर परिसरात वास्तव्यास असलेल्या साधना शिवाजी भंडारे (४०) यांनी याप्रकरणी तक्रार केली आहे. तक्रारीनुसार मढ येथील शिवाजी नगरमधील सीटीएस क्रमांक ६७७ येथे ६० खोल्या देण्याचे आश्वासन आरोपींनी भंडारे व इतर ५९ महिलांना दिले होते. यासंदर्भात आरोपींनी महिला मंडळातील ६० महिलांसोबत कागदोपत्री करार करून प्रत्येकी चार लाख रुपये घेतले, असे तक्रारीत म्हटले आहे. २० ऑगस्ट २०१६ ते २१ जून २०२४ या कालाधीत हा गुन्हा घडला. सामंजस्य करारानुसार या सर्व महिलांनी प्रत्येकी ४ लाख रुपये




असे एकूण दोन कोटी ४० लाख रुपये आरोपींना दिले. पण त्या ठिकाणी अद्याप कोणत्याही प्रकारच्या खोल्या बांधून तक्रारदार महिलांना देण्यात आलेल्या नाहीत. तसेच त्यांना त्यांचे पैसेही परत मिळालेले नाहीत, असे भंडारे यांनी तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीच्या आधारे मालवणी पोलिसांनी याप्रकरणी अविनाश भानजी व प्रमोद भानजी या दोन भावांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणी मालवणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. सर्व तक्रारदार महिला गरीब असून छोटी–मोठी कामे करून आपला उदरनिर्वाह चालवतात. आरोपींनी त्यांच्याकडून चार - पाच हजार असे करून पैसे घेतले होते. तक्रारदार महिलांनी २०१६ पासून रक्कम जमा केली होती. सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी पाच - सहा महिलांना घरे देण्यात आली होती. पण या महिलांकडून रक्कम घेऊन अद्याप त्यांना घर देण्यात आलेले नाही. त्यामुळे याप्रकरणी त्यांनी तक्रार केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याचे मान्य केले.

## मोटरगाडी शिकताना ब्रेकऐवजी एक्सलेटर दाबला; अपघातात एका महिला ठार, दोघे जखमी

**मुंबई :** मोटरगाडी चालविण्यास शिकत असताना वृद्ध महिलेला दिलेल्या धडकेत तिचा मृत्यू झाला. या अपघातात तिघे जखमी झाले असून आरोपी चालक विनापरवाना मोटरगाडी चालविण्यास शिकत होता. याप्रकरणी मोटार चालविण्यास शिकविणारा आणि शिकणाऱ्या अशा दोघांनाही कांदिवली पोलिसांनी अटक केली. त्यांच्याविरोधात निष्काळजीपणाने मोटर चालवून महिलेच्या मृत्युला कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही, असे पोलिसांनी सांगितले. कांदिवली परिसरात वास्तव्यास असलेला टॅक्सीचालक राजेंद्र गुप्ता मित्र सुरेंद्र गुप्ताला शुक्रवारी सकाळी मोटार चालविण्यासाठी शिकवत होता. कांदिवलीमधील पोयसर गांवदेवी रस्ता आणि एस. व्ही रोड दरम्यानच्या परिसरात सुरेंद्र मोटार चालविण्यास शिकत होता. राजेंद्र त्याच्या बाजूला बसून त्याला




मार्गदर्शन करीत होता. सुरेंद्रकडे मोटरगाडी चालविण्याचा परवाना नव्हता. मात्र तरीही तो विनापरवाना मोटर चालवत होता. माय फेअर ग्रीन सोसायटीजवळ शुक्रवारी सकाळी १०.४५ च्या सुमारास सुरेंद्रने ब्रेकऐवजी जोरात एक्सलेटर दाबला. त्यामुळे मोटर वेगात पुढे गेली आणि मोटरीने रस्त्यावरून जाणाऱ्या एका वृद्ध महिलेसह तिघांना धडक दिली. या अपघातात ते तिघेही जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच कांदिवली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी झालेल्या तिघांनाही कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात पोहोचल्यानंतर वृद्ध महिलेला मृत घोषित करण्यात आले, तर इतर दोघांवर प्राथमिक औषधोपचार करून त्यांना घरी पाठविण्यात आले. याप्रकरणी प्रवासकुमार महेश्वर बरल या जखमी पादचाऱ्याच्या तक्रारीवरून कांदिवली पोलिसांनी सुरेंद्र रमेश गुप्ता आणि राजेंद्र चिरकुड गुप्ता या दोघांविरुद्ध हलगर्जीपणाने मोटर चालवून एका वृद्ध महिलेच्या मृत्युस, तर इतर दोघांना जखमी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशीरा या दोघांनाही अटक केली.

# निसर्गासोबत जुगाड खेळणे पडले महागात , अवकाळी पावसाने दिला दिलासा , मोसमी पावसाने फिरविली पाठ , दुबार पेरणीचे संकट



**साखरखेर्डा (अशोक इंगळे )** साखरखेर्डा परिसरात मागील ९ आणि १० जून रोजी जोरदार पाऊस झाल्यामुळे परिसरातील अनेक गावात खरीप हंगामातील पेरणीस सुरूवात झाली . शेतकऱ्यांनी पेरणी केली पण हा निसर्गाशी खेळलेला जुगार चांगलाच अंगलट आला आहे. अवकाळी पावसाने दिला दिलासा, मोसमी पावसाने फिरविली पाठ त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे .मागील हंगामातील सोयाबीनला अपेक्षेप्रमाणे भाव न मिळूनही यावर्षी सुध्दा सोयाबीन च्या पेरणी कडे सर्वात जास्त शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे . परिसरासह संपूर्ण तालुक्यात सोयाबीन ची पेरणी सर्वात जास्त म्हणजे ४५ टक्के क्षेत्रावर होणार असून त्याखालोखाल ३५ टक्के क्षेत्रावर कपाशी ची लागवड केली जात आहे. तूर हे पिक संमिश्र पिकांबरोबर घेतले जात असून तूरीला बऱ्यापैकी भाव मिळत असल्याने तूरीचा पेरा ७ टक्के हेक्टरवर होत आहे . थोड्याफार प्रमाणात मूग , मका , उडीद असा क्रम राहणार असल्याचा अंदाज आहे . तालुक्यात ७८ हजार हेक्टर क्षेत्रापैकी सरासरी हेक्टर क्षेत्रावर खरीपातील पिकांची पेरणी होणार आहे. एकूण भौगोलिक क्षेत्र ७८,११५ हेक्टर इतके असून त्यापैकी ७२,५५४ हेक्टर पेरणीयोग्य क्षेत्र आहे.या क्षेत्रापैकी खरीप हंगामातील पेरणीसाठी वहित केलेले क्षेत्रावर यावर्षी खरीपातील प्रामुख्याने सोयाबीन , कापूस , तूर, मूग , उडीद , मका , तीळ आदी पिकांची पेरणी केली जाणार आहे. सर्वात जास्त ३७,९८० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी केली जाणार असून त्याखालोखाल २५ ,१९५ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली जाणार आहे.४,८९० हेक्टर क्षेत्रावर तूर ,५१३ हेक्टर क्षेत्रावर मूग, ५१५ हेक्टर क्षेत्रावर उडीद आणि ४०० हेक्टर क्षेत्रावर मका आणि सुमारे ५०० हेक्टरवर भुईमूग , तीळ , कराळे , भाजीपाला, ही पिके घेतली जाणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे . परिसरात १० जून रोजी रात्री वादळी पावसाने हजेरी लावली होती . तत्पूर्वी ता.९ ला सुध्दा दुपारी ३ नंतर बऱ्यापैकी पाऊस झाला होता . शेंदुर्जन भागात मान्सून पूर्व रोहिणी नक्षत्रातही बॅऱ्यापैकी पावसाने हजेरी लावली होती . १० जून रोजी झालेल्या वादळी पावसाने जमिनीतील ओलावा पेरणीयोग्य झाल्याने कपाशी तथा कपाशी बिजोत्पादन प्लॉट लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी मृग नक्षत्रातील पेरणीचा लाभ घेण्यासाठी दुसऱ्याच दिवशी कपाशीच्या लागवडीस सुरूवात केली . आणि साखरखेर्डा परिसरातील गोरेगाव , तांदुळवाडी , पांगरी काटे , शेंदुर्जन, दरेगाव , लिंगा , राजेगाव , उमणगाव, वडगावमाळी , कंडारी ,भंडारी , जागदरी, जनुना आदी भागात खरीपाच्या पेरणीस सुरूवात झाली. काही ठिकाणी सोयाबीन पेरले , मूग , उडीद ही टाकला . परंतू लबाड कोल्ह्याने दगा दिला . वटपौर्णिमा पासून मोर पिसारा फुलवून रानोमाळ हिरवळ दाटणार आहे . ज्यांनी मृग नक्षत्रात पेरणी केली , ती जवळजवळ तळपत्या उन्हात करपून गेली आहे . मोसमी पाऊस जो पर्यंत येत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात करु नये असे असताना निसर्गासोबत जुगाड खेळणे चांगलेच महागात पडले आहे. यावर्षी सर्वात जास्त पेरा सोयाबीनचा असून त्या खालोखाल तूर व कपाशी चा पेरा आहे .मागील हंगामातील सोयाबीन व कपाशीला अपेक्षित भाव न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरात मागील वर्षीचे सोयाबीन पडून आहे .तरीही चालू हंगामात शेतकऱ्यांसमोर दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने नाईलाजाने सोयाबीन व कापूस या पिकांच्याच पेरणी कडे वळावे लागले आहे .

# माणसातला देव माणूस प्रकाशभाऊ डोंगरे



जीवनशक्तीचे वहन करणाऱ्या रक्ताच्या दानाएव्हडे महत्व या जगात कश्यालाही नाही. रक्ताशिवाय शरीराची व्याख्याच पूर्ण होउ शकत नाही. त्यामुळेच कदाचित रक्तदानाला महादान म्हटल्या जात असावे . जिल्हा सामान्य रुग्णालय येथून प्रकाश भाऊ डोंगरे यांना कॉल आला की रक्ताची अत्यंत आवश्यकता आहे, प्रकाश भाऊ मुंबई ला एका महत्वाच्या मीटिंग साठी जात होते परंतु हा कॉल येताच क्षणाचाही विलंब न करता परत येऊन त्यांनी स्वत:चे ब्लड तर दिलेच परंतु ब्लडसाठी प्रकाश भाऊ मित्रमंडळाचे सदस्य तुषार भाऊ लोखंडे यांना सुद्धा लगेच कॉल करून बोलाऊन घेतले व ब्लड पण रक्त उपलब्ध करून दिले. प्रकाशभाऊ व त्यांचे मित्रमंडळ नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर राहते.समाजात खरचं अशा लोकप्रतिनिधीची आज गरज आहे , येणाऱ्या मेहकर लोणार विधानसभेत आपल्याला प्रकाशभाऊ यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्यायचे आहे. रक्तदान करणाऱ्या व जीवन वाचविणार्या प्रत्येक अवलीयास कडक सॅल्युट ! आपणही सामील व्हा व राज्यासमोरील रक्तसंकटाला मदत म्हणून आपल्या गावात, शहरात, रक्तदान करा..!



# लिव्ह इन पार्टनरची हत्या करणाऱ्याला अटक

**मुंबई** : लिव्ह इन पार्टनरची हत्या करणाऱ्या ४१ वर्षीय व्यक्तीला नागपाडा पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली. महिलेसोबत झालेल्या वादातून आरोपीने तिच्या पोटावर चाकूने वार केले. पण महिला अपघातात जखमी झाल्याचा बनाव करण्यात आला होता. अखेर वैद्यकीय तपासणीत मृत्यूचे कारण उघड झाल्यानंतर नागपाडा पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. आरती सिंह (३७) असे मृत महिलेचे नाव असून ती आरोपी सिराजुद्दीन जमालुद्दीन शेख ऊर्फ चाँद (४१) याच्यासोबत नागपाड्यातील सोलंकी उद्यानाच्या पदपथावर राहत होती. उभयतांमध्ये १२ जून रोजी कडाक्याचे भांडण झाले. संतापलेल्या चाँदने आरतीला बेदम मारहाण केली व तिच्या पोटावर चाकूने वार केले. त्यात ती गंभीर जखमी झाली. आरतीला आग्रीपाडा येथील नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. आरोपीने




भांडणादरम्यान तिच्या पोटाला खिळा लागल्याची खोटी माहिती दिली. उपचारादरम्यान २० जून रोजी आरतीचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली होती. महिलेची वैद्यकीय तपासणी व पोलिसांनी केलेल्या तपासात तिला गंभीर मारहाण झाल्याचे व तिच्या पोटात धारदार शस्त्राने वार केल्याची माहिती उघड झाली. आरोपीने दोघांमध्ये झालेल्या वादानंतर आरतीला खिळा लागल्याची खोटी माहिती पोलिसांना दिली होती. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ शुक्रवारी आरतीची बहिण रिहाना स-यद (लग्नापूर्वीचे नाव सरस्वती सानप) हिच्या तक्रारीवरून चाँदविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर मोबाइलद्वारे आरोपीचा शोध घेण्यात आला आणि त्याला अटक करण्यात आली. आरोपी चाँद विरोधात २०२१ मध्येही नागपाडा पोलिसांनी मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता. आरोपीने हत्येसाठी वापरलेला चाकू अद्याप हस्तगत करण्यात आलेला नसून त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. मृत आरती मूळची अमरावती येथील रहिवासी होती. तेथे तिच्या दोन मुली आहेत. पतीसोबत पटत नसल्यामुळे ती मुंबईत आली होती. येथे तिने विजय सिंह नावच्या व्यक्तीसोबत लग्न केले होते. त्याच्यापासून तिला चार मुली होत्या. मृत महिला गेल्या एक वर्षांपासून आरोपी चाँदसोबत फॉरस रोड परिसरात पदपथावर राहत होती. तिच्या पोटावर व पायावर गंभीर जखमा असून त्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी नागपाडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# ठाणे कारागृहाच्या जागेवर उद्यान उभारणीच्या प्रस्तावाला वेग; भाजपाचा मात्र विरोध

**ठाणे** : शहरातील ऐतिहासिक ठाणे मध्यवर्ती कारागृह अन्यत्र स्थलांतर करण्याच्या हालचालींना वेग आला असून यासंबंधी पालिका प्रशासनाने सहा वर्षांपुर्वी राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या प्रस्तावानुसार कारागृहाच्या जागेवर उद्यान उभारण्याचा विचार सुरू आहे. त्यास भाजपचे आमदार संजय केळकर यांनी विरोध करत हे उद्यान उभारण्यामागे बिल्डर लॉबीचा डाव असल्याचा आरोप केला आहे. या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी करत ठाणेकरांची अस्मिता जपण्यासाठी या निर्णयाविरुद्ध लोकचळवळ उभारू, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यानिमित्ताने आमदार केळकर यांनी नगरविकास विभागाला घरचा आहेर दिला आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृह हे ब्रिटिश काळापासून आहे. या कारागृहाला क्रांतीकारकांचा इतिहास आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या या कारागृहाला यापुर्वीच पुरातन वास्तुचा दर्जा मिळाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे कारागृह हे शहराच्या मध्यभागी आले आहे. शहरातील हा परिसर महत्वाचा मानला जातो. ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या बाह्य तट भिंतीपासून दिडशे मीटर परिघातील अनेक अधिकृत इमारती आहेत. परंतु कारागृहाच्या परिसरातील बांधकाम निर्बंधांमुळे या इमारतींचा पुर्नविकास अडथळे निर्माण होत आहेत. यातूनच तत्कालीन पालिका आयुक्त




संजीव जयस्वाल यांच्या कार्यकाळात ऐतिहासिक ठाणे मध्यवर्ती कारागृह घोडबंदरला स्थलांतरीत करून कारागृहाच्या जागेवर टाऊन सेंटर विकसित करण्यासंबंधीचा प्रस्ताव पालिकेने शासनाकडे पाठविला होता. प्रत्यक्षात मात्र त्याचे पुढे काहीच झाले नव्हते. आता राज्याच्या गृह विभागाने नियुक्त केलेल्या स्थायी समितीने नियम आणि अटींचे बंधन घालून बांधकाम प्रकल्पांना मान्यता देण्यास सुरुवात केली असून यामुळे येथील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. असे असतानाच, आता ठाणे मध्यवर्ती कारागृह अन्यत्र स्थलांतर करण्याच्या हालचालींना वेग आला असून यासंबंधी पालिका प्रशासनाने सहा वर्षांपुर्वी राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या प्रस्तावानुसार कारागृहाच्या जागेवर उद्यान उभारण्याचा विचार सुरू आहे. त्यास भाजपचे आमदार संजय केळकर यांनी विरोध करत हे उद्यान उभारण्यामागे बिल्डर लॉबीचा डाव असल्याचा आरोप केला आहे. ठाणे कारागृहाची कैदी-क्षमता चार हजारापर्यंत असताना येथे दहा हजारांच्या आसपास कैदी आहेत. त्यामुळे येथील यंत्रणेवर आणि सुविधांवर ताण पडतो. त्यामुळे येथे शेतीसाठी असलेल्या जागेवर विस्तारित बहुमजली कारागृह उभारण्याबाबत येथे नियुक्त झालेल्या अधिक्षकांनी वेळोवेळी प्रस्ताव दिले आहेत. त्यामुळे या जागेवर विस्तारित बांधकाम केल्यास अतिरिक्त ताण दूर होऊ शकेल. या उपरही गरज वाटल्यास भिवंडीत विस्तारित कारागृह उभारता येईल. त्यासाठी हे ऐतिहासिक आणि ठाणेकरांना प्रेरणादायी कारागृह अर्थात ठाणे किल्ला पाडून भव्य पार्क उभारण्याची गरज नाही. या कारागृहात म्युरल्सच्या रूपाने इतिहास जागवणाऱ्या स्मारकाचे काम प्रस्तावित आहे. तसेच २९३ वर्षे जुन्या ठाणे किल्ल्याचा एक दगडही इतिहासप्रेमी ठाणेकर पाडू देणार नाहीत. त्यासाठी पावसाळी अधिवेशनात आवाज उठवू, शिवाय लोक चळवळ उभारू, या निर्णयाचा फेरविचार करावा, असे आमदार केळकर यांनी म्हटले आहे. ठाण्यात नमो पार्क हे भव्य उद्यान असताना ऐतिहासिक ठाणे किल्ला पाडून दुसरे पार्क कशासाठी? ठाण्यात अनेक उद्याने ही ओस पडली आहेत. त्याचे सुशोभीकरण आणि संवर्धन केल्यास ठाणेकरांना त्याचा लाभ होईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे.

## २६ वर्षांत उड्डाण पुलाला तडे, वाहतूक बंद

**नवी मुंबई** : एपीएमसी कडून तुर्भे नाक्याकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाला खालच्या बाजूने तडा गेल्याने वाहतूक तातडीने बंद करण्यात आली आहे. १९९८ मध्ये सिडकोने सदर उड्डाण पुलाची बांधणी केली होती. केवळ २६ वर्षात पुलास तडे गेल्याने दर्जाबाबत शंका उपस्थित होत आहे. वाशी एपीएमसी कडून तुर्भे नाका कडे वळण घेत जाणाऱ्या उड्डाण पुलाखालील प्रि कास्ट बीम बेंड झाले आहे. त्यामुळे लोखंड



वापरून कॉंक्रीट केलेल्या प्लेट्स मध्ये फटी निर्माण झाल्या आहेत. ही बाब लक्षात आल्यावर नवी मुंबई मनपाच्या स्थापत्य विभागाने पुलाची पाहणी केली. कुठलाही अपघात होऊ नये म्हणून वाहतूक बंद करण्याच्या सूचना नवी मुंबई वाहतूक पोलिसांना देण्यात येताच या उड्डाणपुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. याला पर्यायी रस्ता म्हणून तूर्तास सानपाडा ते तुर्भे हा उड्डाणपूल मार्ग आणि हलक्या वाहनास हाच मार्ग वा पामबीच मार्ग सुचवण्यात आला आहे. आज शनिवार मुळे वाहतूक कमी तर रविवारी एपीएमसी बंद असल्याने या मार्गावर वाहतूक अजून कमी असणार आहे. ही काहीशी उसंत पथ्यावर पडली असून या दरम्यान पुलाची पूर्ण तपासणी करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. अशी माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे. सदर पुल धोकादायक झाल्याचे अद्याप स्पष्ट नाही पुलाच्या वरील भागात पूल पूर्ण मजबूत जाणवतो मात्र दुर्दैवी अपघात घडू नये म्हणून काळजी घेतली जात आहे असे वाहतूक पोलीस आणि मनपाने स्पष्ट केले आहे.

## पालिकेच्या प्रकल्पातील खड्ड्यात मुलाचा मृत्यू, ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल

**भाईंदर** : मिरा भाईंदर महापालिकेने जैव इंधन प्रकल्पातील खड्ड्यात ५ वर्षांच्या मुलाच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी संध्याकाळी मिरा रोडच्या पेणकर पाडा येथे ही दुर्घटना घडली होती. काशिमिरा येथील पेणकर पाड्यात शुक्रवारी संध्याकाळी ही घटना घडली. श्रीयांश मोनू सोनी (५) हा मुलगा पेणकर पाडा येथील शिवशक्ती नगरमध्ये पालकांसोबत राहात होता. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास तो इतर मुलांसोबत खेळायला गेला होता. मात्र बराच वेळ घरी न आल्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. यावेळी मैदानाच्या बाजूला जैव इंधन प्रकल्पासाठी पालिकेने खणलेल्या खड्ड्यात त्याचा मृतदेह आढळला. पाण्यात खेळताना बुडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे पालिकेविरोधात मोठा संताप पसरला होता. जो पर्यंत संबंधितांवर गुन्हे दाखल होत नाही तो पर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार केले जाणार नाही, अशी भूमिका मुलाच्या नातेवाईकांनी घेतली होती. तीन वर्षांपूर्वी मिरा भाईंदर महापालिकेने पेणकर पाडा परिसरात कचऱ्यावर प्रक्रिया




करण्यासाठी जैवइंधन (बायोगॅस) प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता. एक वर्षांपूर्वी कामाचे कार्यादेश देण्यात आले होते. मात्र हे काम संथ गतीने सुरू होते. कंत्राटदाराने आता पर्यंत केवळ मोठा खणला होता. माझा एकुलता-एक मुलगा खेळण्यासाठी गेला होता. मात्र महापालिकेने कोणतीही सुरक्षा न बाळगता खोदलेल्या खड्ड्यात पडून त्याचा मृत्यू झाल्याचे मयत मुलाचे वडील मोनू सोनी यांनी सांगितले. या दुर्घटनेनंतर शनिवारी काशिमिरा पोलिसांनी संबंधित ठेकेदाराविरोधात निष्काळजीपणे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साचले होते. त्याला सुरक्षेच्या कुठल्याही उपाययोजना नव्हत्या. महापालिकेच्या ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याने संबंधित ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली. या प्रकरणी संबंधित विभाग प्रमुखांकडून सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे. चौकशीनंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर यांनी सांगितले.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# मस्क बोलले, नेते डोलले

टेस्लाचे सर्वेसर्वा एलन मस्क यांनी तोंड उघडले, किंवा एक्सवर (आधीच्या ट्विटरवर) काही लिहिले, की गदारोळ होणार हे ठरलेलेच. त्यांच्या प्रत्येक वाक्यामागे काही तरी मोठी व्यापारी खेळी दडलेली असते, असा आजवरचा सर्वसाधारण अनुभव. भारतातील लोकसभा निवडणुकीचे निकाल यावेळी कुठल्याही एकाच राजकीय पक्षाकडे किंवा विचारसरणीकडे पूर्णत: झुकलेले नव्हते, त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची म्हणजेच ईव्हीएमची संशयाच्या वर्तुळातून सुटका झाली होती; परंतु, ईव्हीएम हॅक केले जाऊ शकते, असे विधान एक्सवर करून मस्क यांनी भारतात राजकीय खळबळ उडवली आहे. मुंबईतील उत्तर–पश्चिम लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे रवींद्र वायकर यांचा अवघ्या ४७ मतांनी विजय झाला. अशा वेळी अपयशी उमेदवाराने निसटत्या पराभवाची चूटपूट लागल्याने नाना शंका व्यक्त करणे स्वाभाविकच. त्यात पुन्हा निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्याकडील मोबाइल वायकर यांच्या एका कार्यकर्त्याकडे आढळल्याने शंका–कुशंकांना जोर आला. ईव्हीएम ही स्वतंत्र यंत्रणा आहे, ती इंटरनेटशी जोडलेली नसल्याने इतर कुठल्याही यंत्रणेशी ती जोडली जाऊ शकत नाही आणि त्यात कोणी फेरफार करू शकत नाही असा खुलासा निवडणूक अधिकाऱ्यांनी केला. खरे तर मस्क यांनी केलेल्या विधानाला भारतातील लोकसभा निवडणुकीचा संदर्भ नव्हता; मात्र एक्सवरील मस्क यांचे विधान नेमके याच काळात आल्यामुळे संशयाच्या चर्चेला बळकटी मिळाली. मुंबई उत्तर–पश्चिमबाबत सखोल चौकशी झाली तर त्यातून काय निष्पन्न व्हायचे ते होईल; परंतु, मस्क यांच्या विधानानंतर पुन्हा एकदा ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत सरसकट सुरू झालेली चर्चा अनाठायी आहे. मस्क यांच्या या विधानानंतर भारताचे माजी माहिती–तंत्रज्ञान मंत्री राजीव चंद्रशेखर यांच्याशी एक्स वर जी प्रश्नोत्तरांची देवाण–घेवाण झाली त्यात मस्क यांनी एनिथिंग कॅन बी हॅक्ड असे मोघम विधानही केले आहे, आणि व्यापक अर्थाने ते खरेही आहे. परंतु अशा शक्यतांआधारे निर्णय घ्यायचे झाले तर संपूर्ण संगणक प्रणालीच बंद करावी लागेल, इंटरनेटचा वापर थांबवावा लागेल, सायबर फ्रॉडच्या भीतीने इंटरनेट बँकिंकही बंद करावे लागेल. काळाचे चक्र जसे उलटे फिरवता येत नाही, तसेच विज्ञान–तंत्रज्ञानाचे पुढे पडलेले पाऊलही मागे घेता येत नाही. त्याच्या अधिकाधिक सुरक्षित वापरावरच विचार होऊ शकतो. वर म्हटल्याप्रमाणे, मस्क यांच्या विधानांना भारतातील निवडणुकीचा काही संदर्भ नव्हता. पोर्टो रिको या कॅरेबियन बेटावरील प्राथमिक फेरीच्या निवडणुकीत ईव्हीएमचा वापर केला गेला आणि त्यात काही गैरप्रकार घडले, अशी चर्चा आहे. अमेरिकी निवडणुकीतील अध्यक्षपदाचे स्वतंत्र उमेदवार रॉबर्ट एफ केनेडी ज्युनिअर यांनी हा संदर्भ घेऊन, अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ईव्हीएमचा वापर करणे बंद केले पाहिजे असे विधान केले होते. त्यावर मस्क यांनी ईव्हीएम हॅक होण्याचा धोका कमी असला, तरी तो फार मोठा असण्याची शक्यताही नाकारता येत नाही असे अकारण संभ्रम निर्माण करणारे विधान केले. भारतातील ईव्हीएमच्या परीपूर्ण सुरक्षिततेसंदर्भात माजी मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी मस्क यांना उत्तर देणे आपण समजू शकतो. मात्र केवळ एका मतदारसंघातील कथित गोंधळाबाबत शंका व्यक्त केली जात असताना राहुल गांधी, अखिलेश यादव यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्यांनीही लगेचच शंकासुरांच्या रांगेत उभे राहावे याचे आश्चर्य वाटते. देशभराचा विचार केल्यास अत्यंत कमी फरकाने जिंकलेल्या जागांमध्ये काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचेही काही खासदार असू शकतात, याचा विचार त्यांनी केला आहे का? त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, मतपत्रिकांचा वापर होत असतानाच्या काळात झालेले गैरप्रकार, दमनशक्तीचा वापर यांचा आपल्याला विसर पडला आहे का?

# एमपीएससीची तयारी : भूगोल (मुख्य परीक्षा)

सामान्य अध्ययनाच्या पेपर क्रमांक १ मधील भूगोलाचा अभ्यासक्रम जर आपण पाहिला तर एक गोष्ट लक्षात येते की, भूगोलाचा पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम यात खूप साधम्र्य असलेले दिसते. दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये जगाचा प्राकृतिक भूगोल, भारताचा भूगोल व मानवी भूगोलातील बरेचसे पाठ समान असलेले दिसतात. म्हणजेच पूर्व व मुख्य परीक्षांसाठी आपण एकत्रितपणे अभ्यास करू शकतो. जे विद्यार्थी पुढील वर्षी म्हणजेच २०२५ वर्षांसाठी अभ्यास करत आहेत त्यांनी आत्ताच पूर्व व मुख्य परीक्षेचा वेगवेगळा अभ्यास करण्याऐवजी एकत्र अभ्यास केल्यास त्याचा फायदा होईल. आता आपण मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमाबाबतीत चर्चा करू.




**मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम खालील मुद्दे व्यापतो.**

जगाच्या प्राकृतिक भूगोलाची प्राकृतिक वैशिष्ट्ये; जगातील (दक्षिण आशिया व भारतीय उपखंडासहित) महत्त्वाच्या नैसर्गिक संसाधनांचे वितरण; जगातील विविध भागातील (भारतासहित) प्राथमिक, दु-यम व तृतीय क्षेत्रातील उद्योगांच्या स्थान निश्चितीवर परिणाम करणारे घटक; भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखीय क्रिया, आवर्त इत्यादी महत्त्वाचे भूभौतिक घटनादृश्ये; भौगोलिक वैशिष्ट्ये. व त्यांचे स्थान - कळीच्या/ महत्त्वाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर (जलसाठे व हिमाच्छदित प्रदेशांसहित), प्राणी व वनस्पतींवर होणारे बदल व या बदलांचे परिणाम इत्यादी.

वरील अभ्यासक्रमांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास काही महत्त्वाचे शब्द किंवा संज्ञा आपणांस लक्षात येतील. जसे, प्राकृतिक भूगोल, संसाधने, उद्योगांचे वितरण, भूभौतिक घटनादृश्ये व भौगोलिक वैशिष्ट्यांवर होणारे परिणाम इ. या सर्व संज्ञांची आपणास पोटफोड करून त्याखाली आपल्याला काय अभ्यासायचे आहे हे पाहणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमाचे व संज्ञांचे विश्लेषण करून आपण भूगोलाला जगाचा व भारताचा प्राकृतिक भूगोल, आर्थिक व मानवी भूगोल अशा दोन भागात विभागू शकतो.

जगाच्या व भारताच्या प्राकृतिक भूगोलात खालील घटक येतात.

१. मूलभूत संकल्पना : विश्वाची निर्मिती, सूर्यमाला, पृथ्वीचे परिवलन, परीभ्रमण व त्याचा परिणाम, भूशास्त्रीय कालरचना इ.

२. भूरूपशास्त्र : पृथ्वीचे अंतरंग, खडक व खनिजे, भूकवचावर कार्य करणाऱ्या भूअंतर्गत व बहिर्गत भूरुपीय प्रक्रिया/ शक्ती, भूकंप, ज्वालामुखी, खंड व महासागरांचे वितरण–खंडवहनाचा सिद्धांत, सागरतळ विस्तार संकल्पना, भूसांरचनिकी सिद्धांत, बाह्यकारकांची भूरूपे, नदी, हिमनदी, वारा, सागरी लाटा व भूजलामुळे निर्माण होणारी कास्र्ट भूरूपे इ.

३. हवामानशास्त्र : वातवरणाची रचना व घटक, सौर उत्सर्जन, पृथ्वीचा औष्णिक ताळेबंद, तापमान, आर्द्रता, सांद्रिभवन, वर्षा, वातावरणीय दाब, वातावरणीय परिसंचलन/ अभीसरण–वारे व त्यांचे प्रकार, आवर्त, प्रत्यावर्त, जेट प्रवाह, वायूराशी, मान्सून, हवामानाचे वर्गीकरण -ब्लादिमार कोप्पेनचे, जि. टी. त्रिवार्थाचे, सि. डब्ल्यू थॉर्नवेटचे, जगाचे विविध हवामान विभाग, जलचक्र इ.

४. सागरशास्त्र : पृथ्वीवरील महासागरांची तळरचना, सागरजलाचे गुणधर्म जसे तापमान, क्षारता व घनता त्यांचे उध्र्वगामी व क्षितीजसमांतर वितरण, सागरजलाच्या हालचाली जसे सागरीलाटा व त्यांची वैशिष्टये, भरती–ओहोटीच्या लाटा व त्यांचे प्रकार, त्सुनामी लाटा त्यांची कारणे व परिणाम, सागरी प्रवाह–त्यांचे निर्मिती घटक, प्रकार, वितरण व त्यांचे सागरी व हवामानीय परिणाम, सागरी निक्षेप–जैविक, अजैविक, ज्वालामुखी व भूजन्य, सागरी संसाधने– सागरपृष्ठीय, सागरतलीय, जैविक, ऊर्जासंसाधने, प्रवाळभित्तीका □ त्यांची निर्मिती, प्रकार, महत्त्व व प्रवाळ विरंजन, सागरी कायदे इ.

५. जैवभूगोलशास्त्र : मृदा निर्मितीस आवश्यक घटक, मृदेचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म, मृदा निर्मिती प्रक्रिया, मृदेचे वर्गीकरण, मृदा उच्छेद, मृदा निचरण, मृदेची धूप व संवर्धन, वनसंसाधने - नैसर्गिक वनसंपत्तीचे वर्गीकरण, कृषीवनीकरण, समुदाय वनीकरण इ.

६. पर्यावरण भूगोल : जैवविविधता, प्रदूषण, परिसंस्था, वाळवंटीकरण, निर्वनीकरण, पूर, दुष्काळ, हवामान बदल व जागतिक तापमानवाढ इ.

अ. भारताचा प्राकृतिक भूगोल : भारताचे स्थान व सीमा, भारताचे भूशास्त्रीय विभाजन, प्राकृतिक विभाग जसे उत्तर भारतीय पर्वतरांगा किंवा हिमालय, उत्तर भारतीय मैदान, भारतीय पठार/ द्विपकल्प, किनारी मैदानी प्रदेश व भारतीय बेटे, भारतीय नदीप्रणाली -हिमालयातील व पठावरावरील, भारतीय हवामान -हवामानावर परिणाम करणारे घटक, मान्सूनचे सिद्धांत, ऋतू, एल निनो–ला नीना, भारताचे हवामान विभाग, भारतातील मृदा व वनसंपत्ती इ.

जगाच्या व भारताच्या वरील प्राकृतिक भूगोलाचा अभ्यास करताना पाठांतरापेक्षा संकल्पना व भौगोलिक घटनादृश्ये समजून घेण्यावर भर ठेवावा. वरील पाठांवर येणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप पाहिल्यास स्थिर घटकांवर येणारे प्रश्न कमी असून विश्लेषणाधारीत प्रश्नांची संख्या जास्त असते. आता आर्थिक व सामाजिक भूगोलाच्या अभ्यासक्रमाकडे वळूयात.

१. आर्थिक भूगोलातील मूलभूत संकल्पना : आर्थिक भूगोलाची व्याख्या, व्याप्ती, प्राथमिक, दु-यम, तृतीय, चतुर्थ अशा आर्थिक क्रियांचे प्रकार, समकालीन मुद्दे, प्रादेशिक आर्थिक गटांचा उदय इ.

२. कृषी : कृषी प्रारूपे, उत्पादकता, कृषी तीव्रता अशा मूलभूत संकल्पना, जगातील शेतीचे प्रकार, भारतीय शेतीची वैशिष्ठये, शेतीच्या समास्या, भारतीय शेतीवर परिणाम करणारे भौगोलिक, संस्थात्मक व तांत्रिक घटक, भारतातील महत्त्वाची पिके, कृषी क्षेत्रातील क्रांती - हरितक्रांती, निलक्रांती, पितक्रांती, श्वेतक्रांती इ., कृषीक्षेत्रातील महत्त्वाची शासकीय धोरणे व उपक्रम, विपणन, वित्तपुरवठा, किमान आधारभूत किंमत, अन्नसुरक्षा, जनुकीय सुधारित पिके, हवामान बदलाचा शेतीवरील व जागतिक अन्न–सुरक्षेवर होणारा परिणाम, सदाहरित, हरित क्रांती, कोरडवाहू शेतीच्या समस्या, कंत्राटी शेती इ.

३. मानवी विकास : वाढ विरुद्ध विकास, मानवी विकासाचे दृष्ठिकोन, मानवी विकास निर्देशांक, जागतिक मानवी विकास अहवाल, प्रादेशिक विकास व त्यातील मुद्दे इ.वरील घटकांव्यतिरिक्त उद्योग, नैसर्गिक संसाधने, लोकसंख्या, भूगोल व वाहतूक–दळणवळण हे घटकही मानवी व आर्थिक भूगोलामध्ये येतात. परंतु, त्यासंदर्भात आपण पुढील लेखामध्ये चर्चा करू.

# कल्याणमधील सॉफ्टवेअर इंजिनिअरची नोकरीच्या आमिषाने ४० लाखाची फसवणूक

**कल्याण :** कल्याण पूर्वेत राहत असलेल्या २५ वर्षाच्या सॉफ्टवेअर इंजिनिअरची दोन महिलांनी अर्धवेळ ऑनलाईन नोकरी देण्याचे आमिष दाखवून गेल्या दहा दिवसाच्या कालावधीत ४० लाख ४० हजार ३०० रूपयांची फसवणूक केली आहे. प्रतिक अरविंद सिंग (२५, रा. माधुरी हॅप्पीहोम, हनुमाननगर, कल्याण पूर्व) असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव आहे. प्रिया आणि अविका मिश्रा अशी आरोपी महिलांची नावे आहेत. ६ जून ते १६ जून या मागील दहा दिवसांच्या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. कोळसेवाडी पोलीस ठाण्यात प्रतिक सिंग याने तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, प्रतिक सिंग हा सॉफ्टवेअर इंजीनिअर आहे. मागील पंधरा दिवसापूर्वी प्रतिक घरी असताना त्यांना प्रिया आणि अविका मिश्रा या दोन् महिलांनी मोबाईलच्या माध्यमातून संपर्क साधला. त्यांना ऑनलाईन माध्यमातून अर्धवेळ नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. घरबसल्या अर्धवेळ नोकरी मिळते म्हणून प्रतिकने या महिलांच्या संपर्काला प्रतिसाद दिला. आरोपी महिलांनी प्रतिकला व्हॉट्सप आणि टेलिग्रामच्या माध्यमातून संपर्क करून त्यांना एक जुळणी पाठवली. या जुळणीच्या (लिंक) माध्यमातून एक गुंतवणुकीचे साधन पाठवून त्या माध्यमातून प्रतिकला टप्प्याने गुंतवणूक करण्यास भाग पाडले. गुंतवणूक



साधनाचा गुणांक वाढेल त्याप्रमाणे तुम्हाला अधिकचा नफा मिळेल असे आश्वासन आरोपी प्रिया, अविका यांनी प्रतिकला दिले. अशाप्रकारे गोडबोलून या भामट्या महिलांनी प्रतिकच्या कल्याण पूर्वेतील सूचकनाका येथील एचडीएफसी बँकेतून स्वताच्या संशयित बँक खात्यात ४० लाख ४० हजार ३०० रूपये गुंतवणूक वळते करून घेतले. एवढ्या मोठ्या गुंतवणुकीवर तातडीने नफा मिळत असल्याने प्रतिक त्या नफ्याची मागणी आरोपी महिलांकडे करू लागला. परंतु, त्या महिलांनी प्रतिकच्या संपर्काला प्रतिसाद देणे बंद केले. आपणास अर्धवेळ नोकरी नाहीच पण गुंतवणूक केलेल्या रकमेवर अधिकचा परताना मिळत नाही. गुंतवणूक केलेली मूळ रक्कम आरोपी महिला परत करत नाहीत. हे उशिरा लक्षात आल्यावर प्रतिकला आपली फसवणूक या महिलांनी केले असल्याचे निदर्शनास आले. कोळसेवाडी पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान कायद्याने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे याप्रकरणाचा तपास करत आहेत. गेल्या महिनाभरात कल्याण, डोंबिवलीतील दहाहून अधिक नागरिकांची भामट्यांनी ऑनलाईन गुंतवणुकीतून लाखो रूपयांची फसवणूक केली आहे.

# मुंब्रावासियांचा पाण्यासाठी तिरडी मोर्चा; संतप्त नागरिकांनी फोडली मडकी

**ठाणे :** गेल्या पंधरा दिवसांपासून मुंब्रा परिसरात पाणी पुरवठा होत नसल्याचा आरोप येथील नागरिकांनी शनिवारी पालिका प्रभाग समिती कार्यालयावर तिरडी मोर्चा काढला. या दरम्यान, पालिका कार्यालयाच्या दारात मडकी फोडून नागरिकांनी संताप व्यक्त केला. तसेच येत्या मंगळवार



पर्यंत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाहीतर, पालिका मुख्यालयावर बुधवारी मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला. धरण क्षेत्रातील पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी दहा टक्के कपात लागू करण्यात आली आहे. या कपातीमुळे ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पाणी टंचाईची समस्या निर्माण होत आहे. तर, मुंब्रा परिसरात गेल्या १५ दिवसांपासून पाणीच येत नसल्यामुळे टँकरद्वारे पाणी घ्यावे लागत आहे. याविरोधात पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते शानू पठाण यांनी आयुक्तांच्या दालनात ठि-या आंदोलन केले होते. त्यावेळेस पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन पालिका अधिकाऱ्यांनी दिले होते. यानंतरही पाण्याचा पुरवठा सुरळीत झालेला नाही. त्यानिषेधार्थ सामाजिक कार्यकर्त्या मर्जिया पठाण नागरिकांनी शनिवारी भर पावसात पालिका प्रभाग समिती कार्यालयावर तिरडी मोर्चा काढला. यामध्ये नागरिक मोठ्या सहभागी झाले होते. मोर्चेकऱ्यांनी पाणीपुरवठा कार्यालयावर धडक दिल्यानंतर कार्यालयाला बंद असल्याचे दिसल्याने संतप्त झालेल्या मोर्चेकऱ्यांनी कार्यालयाच्या दारात मडकी फोडली. तसेच, गेटवर चढून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना अडविले.

# डोंबिवलीत रस्त्यावर सापडलेल्या मतदार ओळखपत्रप्रकरणी बीएलओ अधिकाऱ्यांवर गुन्हा

**कल्याण :** डोंबिवली जवळील पिसवली गाव हद्दीत गुरुवारी रस्त्यावर सापडलेल्या मतदार ओळखपत्र प्रकरणात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत कल्याण ग्रामीणच्या निवडणूक अधिकाऱ्याने संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या विरुध्द शुक्रवारी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या कारवाईत कल्याण डोंबिवली, ठाणे पालिका शाळांमधील शिक्षक, कर्मचारी अडचणीत येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



गुरूवारी रस्त्यावर मतदान ओळखपत्र सापडल्यापासून कोणतीही भूमिका न घेर्णाय़ा कल्याण ग्रामीण निवडणूक विभागाने कल्याण लोकसभेच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी या लोकसभेची निवडणूक रद्द करून फेर निवडणूक घेण्याची मागणी शुक्रवारी दुपारी केली. त्यानंतरच्या दोन तासात खडबडून जागे झालेल्या निवडणूक विभागाने तत्परतेने हालचाली केल्या. या प्रकरणाला जबाबदार असणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (ब्लॉक लेव्हल ऑफिसर) यांच्यावर मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. कल्याण ग्रामीणचे मतदान नोंदणी अधिकारी विश्वास गुर्जर यांनी सांगितले, पिसवली गाव हद्दीत रस्त्यावर एका पोतडीत ७२० जुनी मतदार ओळखपत्रे, पाच शैक्षणिक कागदपत्रे आढळली. ही सर्व कागदपत्रे कल्याण डोंबिवली पालिकेच्या कल्याण पूर्वेतील नेतिवली येथील शाळा क्रमांक १९ मधील आहेत. या शाळेतील रद्दी शिक्षकांनी काढून ती रद्दी विक्रेत्याला विकली होती. या रद्दीमध्ये शालेय कागदपत्रांबरोबर शिक्षकांनी शाळेत असलेली मतदान ओळखपत्रे एका पोतडीत भरून ती रद्दी विक्रेत्याला विकली होती. ही रद्दी एक टेम्पोत भंगार विक्रेता घेऊन जात होता. त्यावेळी पिसवली गावाच्या प्रवेशव्दार कमानीजवळ टेम्पोतून मतदान ओळखपत्रे असलेली पोतडी पडली. ती टेम्पो चालक, भंगार खरेदीदाराच्या निदर्शनास आली नाही. पोतडीत मतदान ओळखपत्रे असल्याने एका नागरिकाने ती मानपाडा पोलिसांच्या ताब्यात दिली. ६७९ ओळखपत्रे २००६ ते २००४ काळातील जुनी आहेत. ४१ स्मार्ट कार्ड यात आहेत. ती २०१७ ते २०२१ काळातील आहेत. शाळेतून रद्दी विकताना संबंधित शाळेतील शिक्षक, शाळाप्रमुख, या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी जी काळजी घेणे आवश्यक होते. ती न घेतल्याने या प्रकरणाशी संबंधित कल्याण डोंबिवली पालिकेतील कर्मचारी, दिवा प्रभाग समिती कार्यालयातील कर्मचारी यांच्यावर हलगर्जीपणाचा ठपका ठेवत त्यांच्यावर निवडणूक विभागाने शुक्रवारी गुन्हा दाखल केला. तसेच, या कर्मचाऱ्यांना निवडणूक विभागाने व्यक्तिगत पातळीवर कारवाईच्या नोटिसा बजावल्या आहेत, असे मतदान नोंदणी अधिकारी विश्वास गुर्जर यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदबाने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आला आहे. तक्रारदार उमेदवार वैशाली दरेकर यांनी याप्रकरणाची निष्क्षपातीपणे चौकशी झाली नाहीतर आपण केंद्र, राज्य निवडणूक आयोगाकडे दाद मागणार आहेत, असे सांगितले.

# पंकजाताई मुंडे वडीगोद्रीत ; प्रा. लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाला दिली भेट

## वंचितांच्या लढ्यासाठी मी सोबत ; सरकारने हे उपोषण सन्मानाने सोडवावं



**जालना :** भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी संध्याकाळी वडीगोद्री येथे ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची उपोषण स्थळी जावून भेट घेतली. उपोषणाचा आजचा पाचवा दिवस होता. दरम्यान वंचितांच्या लढ्यात मी या दोघांसोबत आहे. सरकारने सन्मानाने त्यांचे उपोषण सोडवून न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसीला धक्का लागणार नाही याची लेखी हमी सरकारने द्यावी या मागणीसाठी गेल्या चार दिवसांपासून लक्ष्मण हाके व त्यांच्या सहकार्‍यांनी उपोषण सुरू केले आहे. संध्याकाळी पंकजाताईंनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, दोन दिवस झाले मी अत्यंत विचित्र तीव्र दु:खी भावनांना सामोरे गेले आहे. मला भेटल्या भेटल्या लक्ष्मण दादा रडायला लागले. ताई, तुमच्या पराभवामुळे चार लोकांनी आत्महत्या केल्या, मला बघून रडू येतंय. परिस्थिती हाताळत असल्याने याला कोणतंही राजकीय वळण लागू नये. इथे मी यासाठी आले आहे की फक्त वंचित लोकांसाठी लढणाऱ्या माझ्या भावांकडे जाऊन त्यांचं म्हणणं काय आहे ते ऐकते आणि ते सरकारसमोर मांडण्याचा शब्द देते. धनंजय भाऊ कृषी मंत्री आहेत, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यामुळे सरकारला तिथे जाऊन सांगण्याची गरज नाही. सरकारच इथे आहे, मी त्यांना इथंच सांगते.□

**ओबीसी समाजाच्या भावना ऐकून घेतल्या पाहिजेत**

माझी मागणी सर्वात महत्त्वाची आहे. आज माझं म्हणणं सर्वांनी ऐकावं अशी विनंती आहे. आंदोलन देशात कुणीही करु शकतं. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे. या आंदोलनाला कायद्याच्या चौकटीत बसून न्याय देणं हे सरकारचं कर्तव्य आहे. मी कुठली प्रतिनिधी म्हणून येथे आलेले नाही. तर मला असं वाटलं की, इथेसुद्धा मोठ्या नेत्यांनी येऊन आंदोलकांच्या भावना ऐकून घेतल्या पाहिजेत आणि न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे, असंही पंकजाताई मुंडे पुढे म्हणाल्या

**सरकारने या दोघांचंही उपोषण सन्मानाने सोडवावं**

लक्ष्मण हाके यांनी आज पाणी सोडलं आहे. पण त्यांचे चेहरे टवटवीत आहे, कारण संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला आहे. डोंगर, कपार्‍यात जाऊन जीवन जगणारा हा माझा वंचित समाज आहे. या समाजाचा काय आवाज आहे, तो आवाज सरकारने ऐकायलाच पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना माझी विनंती आहे, ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही ते आम्हाला समजावून सांगा. मराठा आरक्षणाला आमचा विरोध असण्याचं कारणच नाही. पण चुकीच्या पद्धतीने सर्टिफिकेट दिले जात असतील तर ते मान्य नाही. सरकारने या दोन्ही जणांचे उपोषण सोडवण्यासाठी यावं. ज्याप्रकारे इतरांचं उपोषण सोडवलं जातं त्याच प्रमाणे सन्मानाने यांचं उपोषण सोडवलं जावं, असं आवाहनही पंकजाताई मुंडेंनी केलं आहे.

# पंतप्रधान मोदींनी उद्घाटन केलेल्या १८ हजार कोटींच्या अटल सेतूला तडे ; नाना पटोलेंनी समोर आणली दुरवस्था





**नवी मुंबई :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महायुती सरकारने मोठा गाजावाजा करत मुंबई आणि नवी मुंबईला समुद्रमार्गे जोडणाऱ्या अटल सेतूचे उद्घाटन केले होते. मात्र अवघ्या काही महिन्यात अटल सेतूच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी थेट अटल सेतूवर जाऊन या रस्त्याची दुरवस्था दाखवून दिली. रस्त्याला लांबच लांब भेगा पडलेल्या दिसत असून या भेगा हातभर खोल असल्याचेही नाना पटोले यांनी दाखवून दिले. यावेळी माध्यमांशी बोलत असताना नाना पटोले म्हणाले की, बँकांकडून मोठी कर्ज काढून सरकार रस्तेबांधणी करते. जनतेची संपत्ती गहाण ठेवून कर्ज काढली जातात. मात्र लोकांच्या जीविताशी खेळण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसत आहे. समृद्धी महामार्ग तर लोकांना मरण्यासाठीच तयार केला असल्याचा आरोप आम्ही वारंवार करत आलो होतो. अटल सेतू मार्गावरील दुरवस्था दाखवून देत आहेत. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीनच महिन्यांपूर्वी लोकार्पण झालेल्या धअटल सेतूध पुलास भेगा पडल्याची बाब अतिशय चिंताजनक आहे. मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने प्रवाशयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काँग्रेसकडून आम्ही राज्यभर महायुतीवर चिखलफेक करत आहोत. त्याप्रमाणेच जनतेनेही या भ्रष्टाचारी सरकारवर आज चिखलफेक केली पाहीजे. भ्रष्टाचार हाच एकमेव अजेंडा या सरकारचा दिसतो, अशीही टीका नाना पटोले यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या रस्त्याचे भूमिपूजन केले होते. देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव या रस्त्याला दिले होते. वाजपेयी हे देशातील उत्तुंग नेत्यांपैकी एक होते. त्यांच्याही नावाचा अवमान यामुळे झाला असल्याचा आरोप पटोले यांनी केला. आगामी विधिमंडळाच्या अधिवेशनात आम्ही महायुती सरकारच्या भ्रष्टाचारावर पुराव्यानिशी हल्लाबोल करणार आहोत, असेही सुतोवाच नाना पटोले यांनी केले. कर्नाटकमधील भाजपा सरकार हे ४० टक्के कमिशन घेत होते. मात्र महाराष्ट्रातील महायुती सरकार हे १०० टक्के कमिशन खाते, असा आरोपही नाना पटोले यांनी केला. २०१८ पासून या १८००० कोटी रुपयांच्या सेतूच्या बांधकामाची सुरुवात झाली होती. नियोजनानुसार हे काम ४.५ वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र करोना महामारीमुळे प्रकल्प आठ महिन्यांनी लांबणीवर पडला होता. शिवडीला मुख्य भूभागावरील न्हावा-शेवाशी जोडणारा २२ किमी लांबीचा सहा-लेन पूल, १६.५ किमी लांबीचा समुद्रमार्ग आणि जमिनीवरील ५.५ किमी मार्गांचा अटल सेतूमध्ये समावेश आहे. या सेतूच्या बांधकामासाठी १७७,९०३ मेट्रिक टन स्टील आणि ५०४,२५३ मेट्रिक टन सिमेंट वापरण्यात आले आहे. सध्या, नवी मुंबईला जाण्यासाठी दोन प्रवेश पॉईंट्सआहेत- एक ऐरोली-मुलुंड कनेक्टर आणि दुसरा वाशी कनेक्टर. जर कोणी अलिबाग किंवा माथेरान किंवा लोणावळ्याला जात असेल तर ते अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी असलेल्या या कनेक्टर मार्गे जातात. मुंबई आणि नवी मुंबई दरम्यानचा प्रवास वेळ कमी होऊन रायगड जिल्ह्यासह आर्थिक एकीकरण होण्यासाठी मदत होईल, असे सांगितले जाते.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.
मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789